अतितात्काळ/कालमर्यादा

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/स्मार्ट पोलीसिंग/वैद्य.तपासणी/२२९(१६)२०१७, मुंबई, दि.~~३०.६.२०१७~~ ०१.७.२०१७

**विषय -** राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्या वयावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची वर्ष २०१७-१८ मध्ये वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयांकडून करण्याबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयाबाबतच्या शासन निर्णय गृहविभाग क्र.पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७, दि.२७.६.२०१७ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये राज्य पोलीस दलात कार्यरत असलेल्या ४५ वर्ष व त्या वयावरील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी (भापोसे वगळून) यांची सन २०१७-१८ मध्ये शासकीय रुग्णालयातून वैद्यकीय तपासणी रु.५००/- इतक्या खर्चाच्या मर्यादेत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

३. तरी सर्व घटक प्रमुखांना सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य विभाग यांच्याशी समन्वय ठेवून त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत ४५ वर्ष व त्या वयावरील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी (भापोसे वगळून) यांच्या उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व ११ वैद्यकीय तपासण्या दि. १ जूलै ते ३० सप्टेंबर २०१७ या कालावधीत निश्चितपणे पूर्ण करून घ्याव्यात. सदर उपक्रमांतर्गत घटकातील ४५ वर्ष व त्या वयावरील १०० % पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासण्या पूर्ण होण्यासाठी घटकातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यावर जबाबदारी सोपवून उपक्रम यशस्वी करावा. त्याबाबतचा अनुपालन अहवाल खालीलप्रमाणे प्रत्येक महिन्याला सादर करावा.

१. घटकात कार्यरत असलेल्या ४५ वर्ष व त्या वयावरील पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची फक्त संख्या

२. जूलै, ऑगस्ट व सप्टेंबर या प्रत्येक महिन्यात वैद्यकीय तपासणी केलेल्या पोलीस अधिकारी /कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे १५ ऑगस्ट/ १५ सप्टेंबर पर्यंत व तीनही महिन्यांचा एकत्रित अहवाल १५ आक्टोंबर पर्यंत निश्चितपणे या कार्यालयास कळवावा.

३. वैद्यकीय तपासणीचा विश्लेषण अहवाल संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून खालील तक्त्यांमध्ये प्राप्त करून घेवून तो या कार्यालयास (फक्त संख्या) कळवावा.

| NAME OF UNIT | NO. OF POLICE OFFICER/ MEN OF AND ABOVE 45 YEAR OF AGE | TOTAL PERSONNEL CHECKED IN JULLY/ AUG/SEPT 2017 | SICKNESS FOUND | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 5 | | | | | |
| | | | NO. OF POLICE PERSONNEL FOUND DIABETIC | NO. OF POLICE PERSONNEL FOUND HYPERTENSIVE | NO. OF POLICE PERSONNEL FOUND WITH LIVER DISORDER | NO. OF POLICE PERSONNEL FOUND WITH KIDNEY DISORDER | NO. OF POLICE PERSONNEL FOUND ANY OTHER DISEASE (PL SPECIFY) | NO. OF POLICE PERSONNEL FOUND HAVING NO AILMENT |
| | | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

४. घटकातील ४५ वर्ष व त्या वयावरील सर्व १००% पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची वैद्यकीस तपासणी ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करून एकत्रित संख्यात्मक अहवाल १५ आक्टोबर २०१७ पर्यंत या कार्यालयास निश्चितपणे सादर करण्यात येईल, याची दक्षता घटक प्रमुखांनी घ्यावी.

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.,म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक/लोहमार्ग / विशेष कृती/द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

829D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे /ना.ह.सं., म.रा., मुंबई/न.वि.अ., नागपूर/फोर्स वन, मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें (रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)

उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.

प्रत,

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.रा. यांचे कार्यालय, मुंबई

२. प्रभारी अधिकारी यांनी www.mahapolice.gov.in. वर उपरोक्त शासन निर्णय कृपया ४ महिन्यांसाठी प्रसिध्द करून, तसे कार्यासन अधिकारी का.क्र. २८- अे यांना कळवावे.

कार्यासन अधिकारी, का.क्र.२८/३३/३६

प्रत सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२

(शासन निर्णय गृहविभाग क्र.पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७, दि.२७.६.२०१७ ला अनुसरुन)

830D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

(464)
(101)

राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्या वयावरील अधिकारी/कर्मचारी यांची वर्ष २०१७-१८ मध्ये वैद्यकीय तपासणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक- २७.०६.२०१७

**संदर्भ-** संचालक, आरोग्य सेवा यांचे पत्र क्रमांक-संआसे/टे-५/कक्ष-३/ पो. अधि. कर्मचारी/ वै.तपासणी/C९१०-१२/२०१६-१७, दिनांक २०/६/२०१७.

**प्रस्तावना :-**

राज्य पोलीस दलामध्ये ४५ वर्षे वयावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी (भापोसे वगळून) एकूण संख्या साधारणपणे ६०,००० इतकी आहे. पोलीसांची कर्तव्य, जबाबदारी व त्यांचेवरील ताण, ह्या बाबी विचारात घेऊन यापूर्वी काही कर्मचा-यांची CSR च्या माध्यमातून वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. राज्य पोलीस दलातील ४५ वर्षे वयावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करण्याची गरज व आवश्यकता आहे. वर्ष २०१७-१८ मध्ये राज्य पोलीस दलातील ४५ वर्षे वयावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची शासकीय रुग्णालयातून वैद्यकीय तपासणी करुन घेण्याबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य पोलीस दलातील ४५ वर्षे अथवा त्यावरील पोलीस अधिकारी/कर्मचारी (भापोसे संवर्ग वगळून) अधिकारी/कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयातून करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर वैद्यकीय तपासणीमध्ये खालील वैद्यकीय तपासण्यांचा समावेश असेल.

१) सखोल वैद्यकीय तपासणी (उंची, वजन इत्यादींसह)
२) रक्त तपासणी (Complete Blood Count - CBC)
३) रक्त शर्करा प्रमाण (Random Blood Sugar-RBS)
४) लिपीड प्रोफाईल चाचण्या (Lipid Profile-Tests)
५) यकृत चाचण्या ( Liver Function-Tests)
६) किडनीबाबत चाचण्या (Renal Fanction-Tests)
७) मौखिक आजार तपासणी (Oral Health Checkup)
८) नेत्र तपासणी (Eye Examination)
९) रक्तदाब तपासणी( Blood Pressure)
१०) ब्रॉकायटीसच्या रुग्णांसाठी छातीचा एक्सरे (X-ray Chest for Patients with branchitis)
११) मधुमेह व रक्तदाब रुग्णांसाठी ई.सी.जी. तपासणी (Electrocardiogram E.C.G. for Patients with Diabetes & Hypertension)